॥ या विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grad
Fax : (02462) 215572 NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२३–२४/४०६ दिनांक ०३/१०/२०२३

## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: "वॉक फॉर फ्रिडम" मध्ये सहभागी होणे बाबत.
संदर्भ: सॅम कोशी, संचालक द मुव्हमेंट इंडीया यांचे दि ०३ ऑक्टोबर २०२३ रोजी प्राप्त परिपत्रक

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय परिपत्रकान्वये न्यायपालीकेतील सहकार्याने भारतभरातील १०० ठिकाणी जिल्हास्तरावर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, एनजीओ, रासेयो, शैक्षणिक संस्था, व्यवसाय व नागरी समाज गट यांच्या वतीने मानवी तस्करी संपविण्यासाठी तसेच मानवी तस्करीबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि मानवी तस्करीतून वाचलेल्यांना यशस्वीरित्या पुनर्वसन करण्यासाठी शनिवार दिनांक १४ ऑक्टोबर २०२३ रोजी आयोजित "वॉक फॉर फ्रिडम" या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याबाबत कळविले आहे.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नित महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात शनिवार दिनांक १४ ऑक्टोबर २०२३ रोजी मानवी तस्करी संपविण्यासाठी तसेच मानवी तस्करीबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी "वॉक फॉर फ्रिडम" या उपक्रमाचे आयोजन करून त्याचे फोटो, व्हिडीओ, सर्व सोशल मिडीयावर // IMTHEMOVEMENT ही हॅश टॅग वापरून प्रसारित करावे व त्याचा अहवाल रा.से.यो. विभागाच्या **nss@srtmun.ac.in** या ई–मेल वर पाठविण्यात यावा, ही विनंती.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती
२) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ